# परिशिष्ट १

## आसादी वार

श्री गुरू ग्रंथसाहिबमध्ये एकूण बावीस वार रचना आहेत. त्यात अत्यंत महत्त्वाची रचना म्हणजे 'आसा दी वार' होय. प्रत्येक गुरुद्वारात रोज सकाळी ही रचना गायली जाते.

महाराष्ट्रात जसे पोवाडा, भारूड, गोंधळ आदी शाहिरी लोकगीतांचे प्रकार आहेत. तसे राजस्थान, पंजाब भागात 'वार' रचना रूढ आहेत. त्यातून शूर वीरांच्या कथा गायलेल्या असतात. पण श्री गुरु ग्रंथसाहिबमधील वार रचनेत मात्र प्रभू परमात्म्याचे गुणगान केले गेले आहे.

आसा दी वारमध्ये गुरूंची महती वर्णन करून, गुरूच्या ठायी प्रत्यक्ष परमेश्वराचा वास आहे असे सांगून, गुरूशिवाय प्रभुप्राप्ती होऊ शकत नाही असे सांगितले आहे. प्रभू परमात्मा हाच एकमेव सत्य आहे. त्याचप्रमाणे त्याने निर्माण केलेले हे जगही मिथ्या नसून सत्यच आहे व त्यातील सर्व व्यवहारही त्याच्याच आज्ञेने होत असतात, त्यामुळे तेही सत्यच आहेत. हे जो जाणतो तोच खरा ज्ञानी व तोच सत्यलोकाप्रत जातो असे ह्यात सांगितले आहे.

आसा दी वारला आध्यात्मिक शिकवणुकीबरोबरच सामाजिक आशय आहे. पण तो आध्यात्मिकतेवर आधारित आहे. त्यात हिंदू व मुसलमानांच्या पाखंडी व्यवहारावर सडेतोड टीका केलेली आहे. त्याचबरोबर सर्व धर्मग्रंथ सत्यच सांगतात हेही सांगितले आहे.

स्त्रियांबद्दल सर्वत्र अनादराचीच भावना दिसते पण आसा दी वारमध्ये स्त्रीची महती गायली आहे व माता म्हणून, जन्मदात्री म्हणून तिचा गौरवच केलेला आहे. एवढेच नव्हे तर स्त्रीशिवाय ह्या जगातील कोणत्याही व्यवहार अशक्य आहे असे सांगून स्त्रीचा सन्मान करण्यास सांगितले आहे.

समाजातील उच्चनीचतेच्या कल्पनेवरही प्रहार करून प्रत्येक जीवाचे ठायी प्रभू परमात्म्याचा अंश असल्याने सारे समान आहेत. कोणीही उच्च नाही, कोणीही नीच नाही. अशी समानतेची व सामाजिक समरसतेची शिकवण दिली आहे.

माणसाच्या पतनाचे प्रमुख कारण अहंकार आहे असे सांगून अहंकाराचा त्याग करून नम्रता धारण करण्यास सांगितले आहे. 'मी करतो' हा भाव टाकून देऊन, सारे काही प्रभू परमात्म्याच्या इच्छेनेच घडते, हे जाणून परमेश्वरास शरण जाऊन त्याच्या इच्छेप्रमाणे जीवन व्यतीत करावे असे सांगितले आहे.

ह्या सर्वांमुळे 'आसा दी वार' हे श्री गुरू ग्रंथसाहिबमधील एक महत्त्वाचे काव्य मानले गेले आहे. म्हणूनच 'आसा दी वार' हे श्री गुरू ग्रंथसाहिब मधील एक महत्त्वाचे काव्य मानले गेले आहे. म्हणूनच आसा दी वार हे काव्य शीख बांधवांच्या दैनंदिन पठणातील काव्य असून प्रत्येक गुरुद्वारात रोज सकाळी त्याचे पठण केले जाते.

◆ ◆ ◆

# परिशिष्ट २

# श्री गुरू तेगबहादरजी यांचे संक्षिप्त चरित्र

श्री गुरु तेगबहादरजी हे शीखांचे नववे गुरु. शीखांचे पाचवे गुरु श्री गुरु अरजनदेवजी यांच्यानंतर धर्मासाठी हौतात्म्य पत्करणारे दुसरे शीख गुरु होत. ह्यांच्या बलिदानाने शीख इतिहासास वेगळे वळण लागले.

**जन्म व बालपण**

शीखांचे सहावे गुरु श्री गुरु हरिगोबिंदराय ह्यांचे तेगबहादर हे सर्वांत शेवटचे अपत्य. तेगबहादर याचा जन्म वैशाख वद्य पंचमी संवत १६७८ म्हणजेच एक एप्रिल सन १६२१ मध्ये अमृतसर येथे झाला. माता नानकी ह्या त्यांच्या माता. तेगबहादर यांना गुरुदित्ता, सूरजमल, अणीराय, अटलराय असे चार भाऊ व बीबी वीरो ही बहीण होती.

तेगबहादर याचा जन्म झाला. त्या वेळी श्री गुरु हरिगोबिंद हे हरि मंदिरात 'आसा दी वार' वरील कीर्तन ऐकत होते. कीर्तन संपल्यावर सेवकाने त्यांना पुत्र जन्माची वार्ता सांगितली. श्री गुरु हरिगोबिंद लगबगीने नानकी देवींच्या महालात गेले. नवजात बालकाच्या मुखावरील तेज पाहून श्री गुरु हरिगोबिंदजी यांनी त्या बालकास वाकून नमस्कार केला. आजूबाजूचे सारे लोक विस्मयचकित झाले. आजपर्यंत त्यांनी आपल्या गुरूंना कोणा पुढेही मान वाकवताना पाहिले नव्हते. त्यांचा एकनिष्ठ सेवक बिधीचंदने धाडस करून विचारले, ''गुरुदेव आज हे असे अक्रित कसे घडले?'' श्री गुरु हरिगोबिंद उत्तरले, ''हे साधेसुधे बालक नाही. ह्याच्या अंगी अद्‌भुत सामर्थ्य आहे. हा दीन-दुबळ्यांचे रक्षण करील. लोकांना भवतापापासून मुक्त करील व अत्याचारी मोगली सत्तेची पाळेमुळे खणून काढील.'' ह्या नवजात बालकाचे नाव तेगबहादर असे ठेवण्यात आलं.

बाल तेगबहादरला रडणे कसे ते ठाऊकच नव्हते. तो सदैव हसतमुख व नुकत्याच उमललेल्या गुलाब पुष्पाप्रमाणे टवटवीत दिसत असे.

बाल तेगबहादरवर माता नानकीचे जीवापाड प्रेम होते. त्या अत्यंत सरळ स्वभावाच्या होत्या. त्यांची वाणी मधुर होती. त्या सुशील होत्या. विनम्र होत्या. त्यांनी बाल तेगबहादरवर फार चांगले संस्कार केले. बालकानेही आईचे हे सारे गुण आत्मसात केले.

तेगबहादरच्या इतर भावंडांचेही त्याच्यावर विलक्षण प्रेम होते. सारी मुले एकत्र खूप खेळत, थट्टा मस्करी करत, हसत खिदळत. पण अनेकदा असे घडे की बाळ तेगबहादर एकदम कोठेतरी एकांत ठिकाणी जाऊन बसे व समाधी मग्न होई. अशा वेळी त्याला खाण्या-पिण्याचे ही भान राहत नसे. त्याला शोधून काढून भानावर आणणे हे इतर भावंडांना कामच होऊन बसे.

**शिक्षण**

तेगबहादरच्या शिक्षणाचा श्री गुरु हरिगोबिंद यांनी योग्य बंदोबस्त केला होता. त्यांचा प्रिय शिष्य भाई बिधीचंद यांनी तेगबहादरला घोड्यावर बसणे, तलवार चालवणे, भाला फेक आदी शस्त्रविद्येत पारंगत केले. त्याबरोबरच तेगबहादर विद्यावान बनावा म्हणून त्यास बाबा बुढाजीकडे पाठविण्यात आले. बाबा बुढाजी हे श्री गुरु नानक देवांपासून सर्व गुरुच्या सेवेत होते. विद्वान होते. शीख पंथाच्या मानमर्यादांचे त्यांना चांगले ज्ञान होते. त्यांनी तेगबहादरला गुरुमुखी लिपी, पंजाबी

भाषा व शीख धर्मविचारात चांगले पारंगत केले. बाबा बुढाजींचे जीवन हे एक आदर्श जीवन होते. त्याचा तेगबहादरच्या जीवनावर खोल परिणाम झाला.

त्यानंतर श्री गुरु हरिगोबिंद यांनी तेगबहादरला भाई गुरुदास यांच्याकडे शिक्षणासाठी पाठवले. भाई गुरुदास ह्यांनी श्री गुरु अरजन देवांना आदि ग्रंथाचे (श्री गुरू ग्रंथसाहिब) संकलनाच्या कामी फार मोलाचे सहकार्य केले होते. ते उच्च कोटीचे विद्वान होते. पंजाबी, हिंदी, संस्कृत आदी भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. ते एक श्रेष्ठ कवी व संगीतज्ञ ही होते. ह्या साऱ्या विद्या त्यांनी तेगबहादरला भरभरून दिल्या व त्यानेही त्या तितक्याच कौशल्याने ग्रहण केल्या.

शस्त्रविद्येत अधिक पारंगतता प्राप्त करण्यासाठी तेगबहादरला भाई जेठाजींकडे पाठवण्यात आले. तसेच शस्त्रविद्या निपुण अशा एक पठाणाचीही नेमणूक करण्यात आली. कुशाग्र बुद्धीच्या तेगबहादरनेही ह्या सर्व विद्या पूर्णपणे हस्तगत केल्या.

तेगबहादरला गरिबांविषयी अत्यंत कळवळा होता. अशा व्यक्तींना तो काहीही देण्यास सिद्ध असे. एकदा एक याचक त्यांच्याकडे आला व मोठ्या अजीजीने याचना करू लागला. जवळच एक मौल्यवान वस्तू होती. ती त्याने त्या याचकास देऊन टाकली. त्याच्या आईने त्यास विचारताच तो म्हणाला, ''नाहीतरी ही वस्तू येथे अनेक दिवस पडूनच तर आहे. मग ती गरजवंताला देऊन टाकली तर काय बिघडले ? त्याच्या ती उपयोगाला तरी येईल. बिचारा सुखी होईल.''

एकदा श्री गुरु हरिगोबिंद यांच्याकडे एक विवाह समारंभ होता. इतर मुलांप्रमाणेच तेगबहादरनेही अंगावर भरजरी पोशाख चढवला होता. वरात पुढे पुढे चालली होती. वाटेवर त्याच्याच वयाचा एक गरीब अनाथ मुलगा उघडावाघडा दीन चेहऱ्याने उभा होता. तेगबहादरला ते पाहावेना. त्याच्या मनात त्या मुलाविषयी कळवळा उत्पन्न झाला. त्याने ताबडतोब आपल्या अंगावरील भरजरी पोशाख उतरवून त्या मुलास दिला. वरातीत गडबड उडाली. श्री गुरु हरिगोबिंद यांना हे वृत्त कळलं. त्यांनी लगेच तेगबहादरला दुसरा पोशाख दिला. वरात पुढे चालू लागले. ह्याबद्दल बोलताना श्री गुरु हरिगोबिंद म्हणाले, ''दया, त्याग ह्या गोष्टी बोलायला फार सोप्या असतात. पण आचरणात आणणे फार अवघड असते. क्वचित कोणी त्यागपूर्वक दुसऱ्यास मदत करतो. पण हा मुलगा ते सहजपणे करतो. हा भविष्यात दुसऱ्याचे दुःख निवारण करण्यासाठी आपल्या सर्वस्वाचाही त्याग करण्यास मागे पुढे पाहाणार नाही.''

### विवाह व गृहस्थ जीवन

तेगबहादर हा मूलत: विरक्त वृत्तीचा होता. त्याला उपजतच ध्यान धारणेत रस वाटत असे. विचारांचा ओढा अध्यात्माकडे होता. त्यामुळे विवाह करण्यास तो फारसा उत्सुक नव्हता. पण वडिलांच्या सांगण्यावरून ते विवाहास तयार झाले व फेब्रुवारी १६३२ मध्ये त्यांचा विवाह करतारपूर येथील लालचंद खत्री यांची सुपुत्री गुजरीदेवी यांच्याशी झाला.

### योद्धा तेगबहादर

तेगबहादर हे जरी आध्यात्मिक वृत्तीचे असले तरी त्यांच्या अंगी क्षात्रतेजही होतेच. ते शस्त्र-शास्त्र निपुण होते.

सन १६२९ मध्ये मुखली खानबरोबर झालेले युद्ध, १६३४ मध्ये पैंदेखानशी झालेली लढाई ह्याचे ते प्रत्यक्षदर्शी होते. तर सन १६३८ मध्ये कालेखान, पैंदेखान व धीरमल यांच्या संयुक्त सेनेशी करतारपूर जवळ झालेल्या घनघोर युद्धात प्रत्यक्ष सहभागी होऊन तेगबहादर यांनी अतुल पराक्रम गाजवून विजय प्राप्त केला व आपले 'तेगबहादर' हे नाव सार्थ केले.

### किरतपूरचा काळ

वारंवार होणाऱ्या लढायांमुळे सुरक्षिततेसाठी श्री गुरू हरिगोबिंदजींनी आपला कुटुंब कबिला किरतपूरला हलवला.

अर्थातच तेगबहादरजीही वडिलांबरोबर किरतपूर येथे राहू लागले. आपला मृत्यू समीप आल्याचे श्री गुरु हरिगोबिंदराय ह्यांनी जाणले व आपल्या नंतर गुरुगद्दी कोणास द्यावी ह्याचा ते विचार करू लागले. श्री गुरु हरिगोबिंदजींच्या चार मुलांपैकी अटलराय हा लहान वयातच समाधिस्थ झाला. सर्वांत मोठा मुलगा गुरूदित्ता हा कर्तृत्ववान होता. पण सन १६३८ मध्ये तोही अचानक वारला. दुसरा मुलगा सूरजमल हा व्यवहारकुशल पण भोगवादी वृत्तीचा होता. अणीरायही गुरुगद्दीस पात्र वाटला नाही. तेगबहादूर ही विरागी वृत्तीचा असल्यामुळे श्री हरिगोबिंद यांना त्या वेळी तो योग्य वाटला नाही. मग त्यांनी गुरुदित्ताच्या मुलांचा विचार सुरू केला. गुरुदित्ताचा मोठा मुलगा धीरजमल दुष्ट प्रवृत्तीचा होता. त्याने मोगलांशी संगतमत केले होते. म्हणून तो योग्य नव्हता. त्यामुळे गुरुदित्ताचा दुसरा मुलगा हरिराय ह्यास गुरुपदी नियुक्त करण्याचा श्री गुरु हरिगोबिंदराय यांनी निर्णय घेतला.

पण त्यांचा हा निर्णय त्यांची पत्नी नानकी यांना मात्र मुळीच आवडला नाही. त्यांनी तसे आपले पती श्री गुरु हरिगोबिंदजी यांना बोलूनही दाखवले. त्यावर श्री गुरु हरिगोबिंदजी नानकी देवींना एवढेच म्हणाले की, ''तू त्याची चिंता मुळीच करू नकोस. नियतीने त्याच्यासाठी काही कार्य राखून ठेवले आहे. योग्य वेळी तो गुरुपद ग्रहण करील व आपल्या कार्याने तो अमर होईल.'' असे सांगून त्यांनी एक तलवार, महावस्त्र व जपमाळ नानकीदेवी यांच्या सुपुर्त केली व सांगितले की, ''या वस्तू जपून ठेवा. योग्य वेळी त्याचा तुम्हास उपयोग होणार आहे.'' हरिराय यांना गुरुपदी बसवून दि. ६ ऑक्टोबर ह्यादिवशी गुरु हरिगोबिंदराय परलोकवासी झाले.

श्री गुरु हरिराय यांनी सन १६४४ ते १६६१ पर्यंत गुरुपद संभाळले. दि. २३ सप्टेंबर १६६१ रोजी आपला लहान मुलगा हरिकिशन ह्यास गुरु गादीवर प्रतिष्ठित करून ६ ऑक्टोबर १६६१ रोजी त्यांनी इहलोक सोडला.

अशा रीतीने श्री तेगबहादरजींची गुरुपदाची ही दुसरी संधीही हुकली. ह्याचे माता नानकी ह्यांना वाईट वाटले. पण तेगबहादरजींना मात्र त्याचे काहीच वाटले नाही. ते आपल्या साधनेत व ईश्वरभक्तीत गढून गेले.

**साधना काळ**

श्री गुरु हरिगोबिंदजी यांनी आपल्या निधनापूर्वी आपली पत्नी नानकीदेवी ह्यांना तेगबहादरला घेऊन त्यांच्या माहेरी, बकाला येथे जाण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे माता नानकीदेवी आपल्या पुत्रास, तेगबहादर यांस, घेऊन बकाला येथे गेल्या.

सन १६४४ ते १६६४ हा श्री तेगबहादरजींचा साधना काळ होता. ह्या काळात ते प्रामुख्याने बकाला येथेच वास्तव्यास होते. त्यामध्ये ते प्रामुख्याने आत्मचिंतनात व भगवद्भक्तीत गढून गेले होते. सन १६५६ ते १६६४ ह्या दरम्यान माता नानकीदेवी, पत्नी गुजरीदेवी, मेहुणे भाई कृपालचंद व काही अनुयायांना घेऊन त्यांनी तीर्थयात्रा केली.

प्रथम ते किरतपूरला येऊन श्री गुरु हरिरायांकडे काही दिवस राहिले. तेथून ते कुरुक्षेत्र येथे गेले. तेथून हरिद्वार वाराणसी, गया अशी तीर्थे करून ते पाटण्यास आले. तेथे बराच काळ राहून ते १६६४ मध्ये परतीच्या प्रवासात दिल्ली येथे आले. त्या वेळी शिखांचे आठवे गुरू बालगुरू श्री गुरु हरिकिसनजी हे दिल्लीस मुक्कामास होते. त्यांना भेटून ही सर्व मंडळी बकाला येथे परत आली.

**बाबा बकाला कोण ?**

श्री गुरु हरिकिसनजी यांना गुरु पद मिळाल्याने त्यांचा मोठा भाऊ रामराय याला त्याचा मत्सर वाटू लागला. त्याने औरंगजेबाकडे तक्रार केली. औरंगजेबाला आयतीच संधी प्राप्त झाली. त्याने ताबडतोब फर्मान काढून बालगुरू श्री गुरु हरि

किसनजी यांना दिल्लीस येण्यास फर्मावले. त्याप्रमाणे श्री गुरू हरि किसनजी दिल्लीस येऊन राजा जयसिंह यांच्याकडे राहिले.

त्या वेळी दिल्लीत देवी या रोगाची साथ चालू होते. बालगुरुंना त्याची लागण झाली. आजार विकोपाला गेला. आपण ह्यातून वाचत नाही. अशी खात्री होताच त्यांनी गुरुगद्दीवर पाच पैसे व श्रीफल ठेऊन 'बाबा बकाले' असा त्रिवार उच्चार केला. ह्याचा अर्थ स्पष्ट होता. पंजाबी भाषेत 'बाबा' ह्याचा अर्थ आजोबा असा होतो. श्री गुरु हरिकिसनजी यांना 'बाबा बकाले' ह्यातून असा संदेश द्यावयाचा होता की,

''माझे आजोबा बकाला ह्या गावी असून ते ह्यापुढे गुरु पदाचा कार्य भाग संभाळतील.''

पण हे समजताच गुरुवंशातील अनेक लोक बकाले येथे ठाण मांडून बसले व मीच गुरु गादीचा हकदार आहे. असा दावा करू लागले. सर्वत्र गोंधळ उडाला. खरा हकदार कोण हे ठरवणे कठीण होऊन बसले. आता हा तिढा कसा सुटणार ?

**गुरू सापडले हो सापडले !**

शीख अनुयायांमध्ये मख्खनशहा नावाचा एक मोठा व्यापारी होता. त्यास शीख अनुयायात मोठा मानही होता. एकदा त्याचे मालाने भरलेले जहाज समुद्री वादळात सापडले. आता आपण मालासह समुद्रात बुडणार अशी त्याची खात्री झाली. त्याने देवाचा धावा केला व नवस केला की, ''मी ह्या संकटातून बचावलो तर गुरु चरणी मी दक्षिणा म्हणून ५०० मोहरा अर्पण करीन.'' वादळ शमले. मख्खनशहाचे जहाज सुखरूप किनाऱ्याला लागले.

मख्खनशहा ८ ऑक्टोबर १६४४ रोज बकाला येथे येऊन पोहोचला. पण तेथे येऊन पाहतो तो स्वत: गुरू म्हणवणारे बावीस लोक आपला गुरु गद्दीवर हक्क सांगत होते. आता खरा गुरु कोण हे कसे ओळखणार. हा त्याच्यासमोर प्रश्न उभा राहिला. त्याने मनाशी काही निश्चय केला व प्रत्येक गुरु म्हणवणाऱ्याकडे जाऊन त्याने प्रत्येका पुढे पाच पाच मोहरा ठेवल्या. सर्वांनी त्याचा स्वीकार केला. शेवटी तो श्री तेगबहादरजी यांचे पुढे येऊन उभा राहिला. त्यांना नमस्कार करून त्याने त्यांच्यापुढे पाच मोहरा ठेवल्या. श्री तेगबहादरजी त्यास म्हणाले, ''बेटा लबाडी करतोस काय ? बाकीच्या ४९५ मोहरा कोठे आहेत ?'' मख्खनशहा स्तंभित झाला. तो धावतच घराच्या गच्चीवर गेला व मोठ्याने ओरडू लागला. ''गुरु सापडले रे सापडले'' सारे लोक घरासमोर जमा जाले. मख्खनशहाने सारी हकिगत लोकांना सांगितली व श्री तेगबहादरजीच 'बाबा बकाले' असून तेच खरे गुरुगद्दीचे हकदार असल्याचा त्याने निर्वाळा दिले. त्याचवेळी माता नानकीदेवींनी श्री गुरु हरिगोबिंद यांनी दिलेली तलवार, महावस्त्र व जप माळ लोकांना दाखवली. तेव्हापासून श्री तेगबहादरजी हे शिखांचे नववे गुरु. श्री गुरु तेगबहादरजी म्हणून जनतेकडून स्वीकारले गेले. अशा तऱ्हेने गुरुगद्दीचा वाद संपुष्टात आला. बाकी सर्व गुरु म्हणवणारे पळून गेले. पण धीरमल मात्र तेथे तळ ठोकून बसला. त्याने 'सिंहान' ह्या आपल्या मसंदाकरवी श्री गुरु तेगबहादर यांच्यावर हल्ला केला. त्याने श्री गुरु तेगबहादरवर गोळी झाडली व त्यांचे घरदार लुटून गेले. गुरु थोडक्यात वाचले. मख्खनशहाला हे वृत्त समजताच त्याने धीरमलवर हल्ला चढवला. त्याचा व मसंदाचा बंदोबस्त केला व श्री गुरु तेगबहादर यांची लुटलेली सारी मालमत्ता परत गुरुगृही आणून दिली.

**अमृतसरकडे प्रयाण**

बकाला गावात जवळ-जवळ वीस वर्षे वास्तव्य केल्यानंतर श्री गुरु तेगबहादरजी आपल्या परिवारासह अमृतसरकडे जाण्यास निघाले. मजल दर मजल करत ते व त्यांच्या बरोबरची शीख संगत २२ नोव्हेंबर १६४४ रोजी अमृतसरला येऊन पोहोचले. पण तेथे त्यांच्या पुढे वेगळेच ताट वाढून ठेवले होते. त्या वेळी हरिमंदिराची व्यवस्था श्री गुरु अरजन देवांचा नातू हरिजी याच्याकडे होती. त्याने हरि मंदिराच्या दारांना कुलपे लावून श्री गुरु तेगबहादरजी यांना हरिमंदिरात प्रवेश करू दिला

नाही. गृहकलह आणखी वाढू नये म्हणून श्री गुरु तेगबहादरजी यांनी अमृतसर सोडून जवळच असलेल्या वल्ला ह्या गावाकडे प्रयाण केले. वाटेत त्यांनी ज्या ठिकाणी मुक्काम केला. त्या ठिकाणी नंतर एक गुरुद्वारा बांधण्यात आला. त्यास 'गुरुद्वारा दमदमा साहिब' असे म्हणतात. काही दिवस वास्तव्य केल्यानंतर ते तरनतारन येथे पोहोचले व काही दिवसांनी खडूर येथे गेले. तेथून गोईंदवाल येथे आले.

### किरतपूर येथे आगमन

गोईंदवाल येथे असताना माता सुलखनी व माता कृष्णा कौर यांच्याकडून किरतपूर येथे येण्याचे आमंत्रण मिळाले. त्याप्रमाणे श्री गुरु तेगबहादर किरतपूरला आले. तेथे त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. माता कृष्णा कौर यांनी सातव्या व आठव्या गुरुचे तख्त शस्त्रे आदी ज्या ज्या वस्तू व सामान माताजींकडे होते, ते ते सर्व त्यांनी श्री गुरु तेगबहादर यांना दिले व त्यांना गुरु दरबारात नेऊन गुरुच्या तख्तावर बसवले. सर्व शीख सेवकांनी त्यांच्या चरणी भेट अर्पण करून त्यांना दंडवत घातला. अशा रीतीने श्री गुरु तेगबहादरजी पूर्ण रूपेण शीखांचे नववे गुरू झाले.

### आनंदपूर नगराची निर्मिती

किरतपूर येथे वास्तव्यास असतानाही भाऊबंदकीने त्यांची पाठ सोडली नाही. श्री गुरु तेगबहादरजी यांची वाढत जाणारी कीर्ती सहन न होऊन त्यांचे एक आप्त बाबा सूरजमल त्यांचा द्वेष करू लागला व त्यांना नाना प्रकारे त्रास देऊ लागला. त्यास कंटाळून त्यांनी किरतपूर सोडण्याचे ठरवले.

त्यांनी माता नानकीदेवींशी विचार विनिमय करून बिलासपूरच्या दीपचंद यांच्याकडून सतलज नदीकाठी एक विस्तृत भूखंड विकत घेतला. हे स्थान किरतपूरपासून आठ मैल दूर नेना देवीच्या डोंगराच्या पायथ्याशी व चारी बाजूनी डोंगर दऱ्यांनी वेढलेले होते. त्यामुळे ते आक्रमकांपासून सुरक्षित होते. तसेच हिरव्यागार वनराईमुळे शांत व रमणीय होते.

ह्या भूखंडावर १९ जून १६६५ रोजी बाबा बुढाजींचे नातू गुरुदित्ताजींच्या हस्ते आधारशिला बसविण्यात आली. लवकरच तेथे एक सुंदर नगरी निर्माण झाली. त्यास माता नानकीदेवींचे नावावरून 'चक्क नानकी' असे नाव देण्यात आले, ह्यासच पुढे 'आनंदपूर' असे संबोधू लागले.

आनंदपूर नगराच्या निर्मितीसाठी श्री गुरु तेगबहादरजी यांनी भाई भागूजी, भाई रामेजी, भाई साधूजी मुलतानी यांची नेमणूक केली. गृह निर्माण, जल व्यवस्थापन व नगर संरक्षणाचा भार त्यांच्यावर सोपवण्यात आला. त्यांच्यावर सर्वांशी प्रेमाने वागण्याची व लंगर चालवण्याची जबाबदारीही टाकण्यात आली.

### धर्म प्रचारार्थ यात्रा

आनंदपूर मध्ये स्थिरसावर झाल्यावर श्री गुरु तेगबहादरजी यांनी धर्म प्रचारार्थ यात्रा करण्याचे ठरवले व एक दिवस ते आनंदपूर सोडून माळव्याकडे जाण्यास निघाले. त्यांचा पहिला मुक्काम घनौल गावी झाला. तेथून पुढे रोपड मार्गे मालुवाल गावाजवळील एक विहिरीजवळ पोहोचले. तेथे त्या गावातील दोन व्यक्ती मइआ व गोंदा गुरु तेगबहादरजींना भेटावयास आल्या. गुरुजींनी त्यांना जवळच्या विहिरीतून पिण्यासाठी पाणी आणण्यास सांगितले. ते म्हणाले, "गुरुजी ह्या विहिरीचे खारट व बेचव आहे. आम्ही दुसरीकडून तुमच्यासाठी पाणी आणतो." गुरुजींनी त्यांना त्याच विहिरीचे पाणी आणण्यास सांगितले. गुरु आज्ञेप्रमाणे त्यांनी पाणी आणले. गुरुजींनी 'वाहिगुरू'चे नाव उच्चारून पाणी प्राशन केले. पाणी पिताच ते उद्गारले, "अरे वा! हे पाणीतर गोड व थंड आहे." ते ऐकून साऱ्या शिखांनी तसेच मइआ व गोंदानेही ते पाणी प्राशन केले. त्या सर्वांनाही तोच अनुभव आला. गुरुच्या सामर्थ्याची चुणूक लोकांना कळली.

काही काळ मालुवाल गावी थांबून श्री गुरु तेगबहादरजी हढियाणे गावाजवळ एका तलावाजवळ येऊन थांबले. गुरुदेव आलेले कळताच त्यांच्या दर्शनार्थ हढियाणे गावाचे लोक त्यांच्या दर्शनार्थ येऊ लागले.

एक दिवस एक भक्त गुरुदेवांच्या दर्शनार्थ आला. त्याच्या अंगात खूप ताप होता. त्या गावात अशा तापाची साथच आली होती. ताप एकदम खूप चढे व त्यातच माणूस मरून जाई. श्री गुरु तेगबहादरजींना त्या भक्ताने हे सारे सांगितले. गुरुजींना त्या भक्ताची कीव आली ते त्यास म्हणाले, ''प्रती क्षणी प्रभू परमात्माचे स्मरण कर 'सतिनाम वाहिगुरू' चा जप कर व ह्या तलावात स्नान कर'' भक्ताने तसे केले. त्याचा ताप निघून गेला. गावातील इतर लोकांना हे कळले अनेक व्याधीग्रस्तांनी 'सतिनाम वाहिगुरू'चा जप केला व त्या तलावात स्नान केले व ते व्याधिमुक्त व निरोगी झाले.

हढियाणे गावाहून पुढे श्री गुरु तेगबहादरजी व त्यांचा परिवार खीवा ह्या गावी येऊन पोहोचले व त्याच वेळी काबूलहून आलेली शीख संगत गुरुदेवांच्या दर्शनार्थ तेथे येऊन पोहोचले. काही दिवस मालवा प्रदेशात काबूलच्या भक्तांबरोबर श्री गुरु तेगबहादरजी राहिले. त्यांनी संगतला उपदेश केला. ते म्हणाले, ''मनुष्यजन्म ही ईश्वरप्राप्तीसाठी देवाने दिलेले अनमोल संधी आहे. ती वाया दवडू नका. जीवन विषयविकारांच्या नादी लागून वाया घालवू नका. सत्यमार्गावर चालून कष्टाची भाकरी कमवा. आपल्या कमाईचा काही भाग गरजू लोकांना देऊन त्यांची सेवा करा. नामस्मरणद्वारे ईश्वरभक्ती करा. 'सहज भक्ती' हा ईश्वरभक्तीचा सर्वोत्तम मार्ग आहे. आपली गृहस्थधर्माची कर्तव्य करत असतानाच सदैव प्रभुनामाचे चिंतन करा. हाच खरा जीवन मार्ग आहे.''

श्री गुरु तेगबहादरजी मजल दर मजल करत सैफाबाद येथे येऊन पोहोचले. तेथील नबाब सैफखान हा शाहजहान बादशहाचा साडू होता. तो काही काळ आग्रा व काश्मीरचा सुभेदार होता. पण आता तो पीर भिख्खनशहाचा शिष्य बनून सन्यस्त जीवन जगत होता. त्याला श्री गुरू तेगबहादरजींच्या आगमनाची वार्ता कळताच ते त्यांना सामोरे गेले व त्यांना आपल्या महालात मुक्कामास घेऊन गेला. महालासमोरच एक सुंदर व भव्य मशीद होती. गुरु तेगबहादरजी सैफखानला म्हणाले, ''ही इतकी सुंदर मशीद असताना मला आपल्या महालात मुक्कामास कशाला आणले ?'' सैफखान म्हणाले, ''आपण पडलात हिंदू. तुम्ही मशिदीत कसे राहाणार ? म्हणून मी तुमच्या मुक्कामाची सोय माझ्या महालात केली, श्री गुरु तेगबहादरजी म्हणाले, ''आम्ही मंदिर व मसजिद यात फरक करत नाही. ईश्वराचा वास सर्वत्र आहे. सर्व जण ईश्वराचीच लेकरे आहेत मग हा मंदिर मसजिद भेद कशाला ?'' ह्या उद्‌गाराने सैफखानला तेगबहादरांच्या विशाल हृदयाची कल्पना आली.

पुढे मार्गक्रमण करत गुरुदेव फगुवाला येथे आले. तेथे घराचों गावचे लोक आले. त्यांनी श्री गुरु तेगबहादरजींना सांगितले, की तेथील सुलतान त्यांना भजन, कीर्तन करू देत नाही. गुरुदेव घराचों गावी पोहाचेले. त्यांनी सुलतानाच्या घराजवळच आपला तळ ठोकला व तेथेच त्यांनी कीर्तन प्रवचनास सुरवात केली. त्यांनी सुलतानास उद्देशून सांगितले की, ''सारे जीव ही त्या प्रभूची, अल्लाचीच लेकरे आहेत. ज्याने त्याने आपापल्या श्रद्धेप्रमाणे प्रभूस आळवावे. त्यात कोणीही अडथळा आणलेला अल्लास आवडणार नाही. सुलतानाने आपल्या प्रजेशी - तो हिंदू असो वा मुसलमान - प्रेमानेच वागावे अशीच अल्लाची सांगी आहे'' त्यांच्या ह्या उपदेशाने सुलतानाचे मतपरिवर्तन झाले. त्याने परत कधी हिंदूंच्या भजन कीर्तनास बाधा आणली नाही.

श्री गुरु तेगबहादरजींचा परिवार पुढे आग्रा येथे आला. तेथे माई भागो नावाची एक वृद्ध स्त्री राहत होती. तिची फार काळापासूनची तीव्र इच्छा होती, की एकदा तरी गुरुदेवांचे दर्शन घडावे. पण वृद्धत्वामुळे ती चालूही शकत नव्हती. श्री गुरु तेगबहादरजींनी अंतर्ज्ञानाने हे जाणले व ते तडक माई भागोच्या घरी गेले. माई भागो अत्यंत आनंदित झाली. तिने त्यांचे

हर्षभराने स्वागत केले. गुरुदेव तिच्याकडे एक महिन्याहून अधिक काळ राहिले व तिची गुरु दर्शनाची इच्छा पूर्ण केली.

पुढे श्री गुरु तेगबहादरजी व त्यांचा परिवार इटावा मार्गे कानपूर व तेथून प्रयागराज तीर्थावर येऊन पोहोचले. तेथे त्यांचा सहा महिने मुक्काम होता, ह्या ठिकाणी भाई जवेहरीलाल अनेक वर्षांपासून शीख धर्माचा प्रचार करत होता. एक दिवस भल्या पहाटे उठून खांद्यावर पंचा टाकून जवेहरीलाल बाहेर निघाला. श्री गुरु तेगबहादरजींनी त्याला थांबवले व विचारले की ''भाई कुठे निघालात ?'' जवेहरीलाल ने उत्तर दिले, ''गंगास्नानाला.'' गुरुदेव म्हणाले ''अरे गंगातर तुझ्या जवळच आहे. तुझ्या हृदयातच आहे. त्यासाठी बाहेर जाण्याची गरज नाही. आपल्या घरातच (हृदयात) शोध घे शिखाला गंगेवर जाण्याची गरज नाही. गंगाच शिखाच्या घरी येते. तिचा घरातच शोध घे.'' भाई जवेहरी लालने 'घरातच' ह्याचा शब्दश: अर्थ घेतला व त्याने घरातील एक वीट बाजूला केली आणि आश्चर्य घडले. तेथून पाण्याचा जोरदार प्रवाह वाहू लागला. गंगा खरोखरच शिखाच्या घरी आली.

प्रयागहून गुरुदेव व त्यांचा काफिला ससराम येथे येऊन पोहोचला. तेथे फग्गू नावाचा एक शीख राहत होत. त्याला सर्व लोक 'चाचा फग्गू' म्हणत असत. तो त्या भागाचा मसंद होता. त्याने गुरुदेवांना आपल्या घरी येण्याची विनंती केली. गुरुदेव फग्गूच्या घरी आले. त्यांनी गुरुदेवांचे स्वागत केले व मसंद म्हणून त्याने गोळा केलेल्या सर्व गोष्टी श्री गुरु तेगबहादरांपुढे ठेवल्या. गुरुदेवांनी सर्व वस्तूंवर नजर फिरवली व म्हणाले, ''अरे पण ह्यात एक वस्तू तू विसरलास. नीट आठव कोणती वस्तू राहिली ते.'' फग्गू विचारात पडला. मग गुरुदेवच त्याला म्हणाले, ''अरे तुझ्या अंगणातील बोराच्या झाडाची बोरे ह्यात दिसत नाहीत.'' हे उद्‌गार ऐकून फग्गू आश्चर्यचकित झाला कारण खरोखरच त्याला मिळालेल्या भेटीत पूर्वी एका बाईने फग्गूस कारभेट म्हणून कचरा फग्गूच्या झोळीत टाकला होता त्यातून एक बोराची बी आली होती. फग्गूने तो कचरा अंगणात टाकून दिली होता. कालांतराने ती बी तेथे रुजली होती व त्याचाच हा वृक्ष झाला होता. श्री गुरु तेगबहादरजींनी हे सारे अंतर्ज्ञानाचे जाणले होते व म्हणूनच त्या बोरीच्या बोरांची मागणी त्यांनी फग्गूकडे केली होती.

ससरामहून पुढे सर्वजण गयामार्गे पाटणा येथे येऊन पोहोचले. त्या वेळी श्री गुरु तेगबहादरजी यांची पत्नी गुजरीदेवी ह्या गरोदर होत्या, दिवस पावसाळ्याचे होते. त्यामुळे श्री गुरु तेगबहादरजी यांनी पाटणा येथे चार महिने मुक्काम केला. पावसाळा संपताच गुजरीदेवी व इतर कुटुंबीय यांना पाटणा येथेच ठेऊन श्री गुरु तेगबहादरजी व इतर शीख संगत डाक्का येथे जाण्यास निघाले.

डाक्का येथे गुरुदेवांचा मुक्काम तेथील मसंद भाई बुलाकीदास यांच्या घरी झाला. भाई बुलाकीदास यांच्या वृद्ध मातेने स्वत: सूत कातून, कापड विणून, त्याचा एक सुंदर अंगरखा शिवून तो श्री गुरु तेगबहादरजी यांना भक्तिभावाने अर्पण केला. गुरुदेवांनी त्यांची प्रेमभक्ती पाहून प्रसन्न होऊन त्यांना नामदीक्षा दिली.

आता श्री गुरू तेगबहादरजींच्या प्रस्थानाची वेळ जवळ येऊन ठेपली. त्या वेळी भाई बुलाकीदासांच्या मातेने गुरुदेवांना विनंती केली, की त्यांची स्मृती म्हणून त्यांची प्रतिमा तिला मिळावी. गुरुदेवांनी त्यास आनंदाने मान्यता दिली. लगेच एका प्रख्यात चित्रकाराला बोलावण्यात आले. त्यानेही सर्व तयारीनिशी चित्र काढावयास सुरुवात केली. सारे चित्र सुंदर जमले. पण काही केल्या चेहरा मात्र नीट जमेना. कारण चेहरेपट्टी रंगवण्यासाठी तो श्री गुरु तेगबहादरजींच्या चेहऱ्याकडे पाहू लागला की त्याची दृष्टी चेहऱ्यावरून हलेचना; इतका तो चेहऱ्यावरील तेजाने भारावून जाई. शेवटी श्री गुरु तेगबहादरजी यांनी त्या चित्रकाराच्या हातातून कुंचला घेऊन स्वहस्ते ते चित्र पूर्ण करून भाई बुलाकीदासच्या मातेस अर्पण केले.

पाटणा येथे दि. २२ डिसेंबर १६६६ ह्यादिवशी माता गुजरीदेवी यांनी पुत्ररत्नास (श्री गुरु गोबिंदसिंघ) जन्म दिला. डाक्का येथे असतानाच ही वार्ता डाक्का येथे श्री गुरु तेगबहादरजी यांना कळवण्यात आली. सर्वत्र आनंदीआनंद पसरला.

रोषणाई करण्यात आली. भजन-कीर्तनाने सारा आसमंत भरून गेला. गोरगरिबांना अन्नदान, वस्त्रदान करण्यात आले.

डाक्क्यातून निघून गुरुदेव असम प्रदेशाकडे जावयास निघाले. त्या वेळी असम प्रदेशावर चक्रधर नावाचा राजा राज्य करत होता. सारा हिंदुस्थान मोगलांनी आपल्या अधिपत्याखाली आणला होता. पण राजा चक्रधर असम प्रदेशात मोगलांची डाळ शिजू देत नव्हता. हे शल्य औरंगजेबला बोचत होते. त्याने जयसिंहाचा पुत्र रामसिंह ह्यास मोठे सैन्य देऊन राजा चक्रधरचा पाडाव करण्यात पाठवले. रामसिंह हा शीख गुरुंचा चाहता होता. त्याने श्री गुरु तेगबहादरना मदतीचे आवाहन केले. तेही त्याच्या मदतीसाठी गेले. पण राजा चक्रधरही शीख गुरुंचा चाहता होता. श्री गुरु नानक हे आपल्या पहिल्या उदासीच्या काळात असमात आले होते. तेव्हा पासून असमात शीख धर्माचा प्रचार झाला होता व तेथील राजे ही शीख गुरुंचा सन्मान करत. श्री गुरु तेगबहादरजींनी राजा रामसिंह व राजा चक्रधर यांच्यात तह घडवून आणला. गुरुदेवांनी आपल्या जवळच्या खंजिराने रेघ मारून मोगल राज्य व चक्रधराचे हिंदू राज्य यांच्यातील सीमा निर्धारित केली. पुढे तेथे एक शहर बसले. त्यास खंजरपूर असे नाव प्राप्त झाले.

असमातून गुरुदेव कलकत्ता व जगन्नाथ पुरी येथे गेले. तेथील शीख संगतला उपदेश करून पाटणा येथे येऊन पोहोचले व तेथून तीर्थयात्रा करत रोपड मार्गे फेब्रुवारी १६७१ मध्ये आनंदपूर येथे परत आले.

### हिंदूधर्मावर घाला

आपल्या बंधूंची कत्तल करून इ. स. १६५७ मध्ये औरंगजेब दिल्लीच्या तख्तावर बसला. औरंगजेब हा अत्यंत हेकट, धर्मांध व क्रूरकर्मा होता. गुजरातचा सुभेदार असताना त्याने हिंदूंवर जुलूम जबरदस्ती करून असंख्य लोकांना बाटवून मुसलमान केले होते. चिंतामणीच्या देवळात गाय कापून त्या देवळाची मशीद केली होती.

बादशाहा झाल्यावर तर त्याने साऱ्या हिंदुस्थानभर हैदोस घातला. नवीन देवळे बांधण्यास बंदी घालण्यात आली. अनेक ठिकणची प्रसिद्ध मंदिरे पाडून तेथील मूर्ती आणून दिल्लीच्या जुम्मा मशिदीच्या पायात गाडण्यात आल्या. हिंदूंच्या सण उत्सवावर बंदी घातली. दिवाळीत पणत्या लावण्यासही त्याने मज्जाव केला. त्याने आपल्या सर्व सुभेदारांना हिंदू देवळे पाडणे, लोकांना सक्तीने बाटवणे वा त्यांची कत्तल करावी अशी फर्माने सुटली. यातून शीख मसंद व गुरुद्वाराही सुटली नाहीत. अशा स्थितीत हिंदूधर्माला कोणी वाली राहिला नाही. सारे जण श्री गुरु तेगबहादरजी यांचेकडे मोठ्या आशेने पाहात होते.

काश्मीरच्या सुभेदाराने तर अत्याचाराची परिसीमाच गाठली. अशावेळी काश्मीरमधील हिंदूंचे एक प्रतिनिधी मंडल श्री गुरु तेगबहादर यांच्याकडे मदतीची याचना करण्यासाठी आनंदपूरला आले. (जेष्ठ शुद्ध एकादशी संवत १७३२, सन १६७५) त्यांनी आपली व्यथा श्री गुरू तेगबहादरजी पुढे मांडली व धर्मरक्षणासाठी त्यांनी त्यांस साकडे घातले.

### अंतिमपर्व

श्री गुरु तेगबहादरजीही चिंताग्रस्त झाले. त्यांचा चिंताग्रस्त चेहरापाहून त्यांचा मुलगा वडिलांना म्हणाला, ''पिताजी तुम्ही एवढे चिंताग्रस्त का आहात. तुम्ही काहीच कसे बोलत नाही?'' गुरुदेव म्हणाले, ''बाळा गोबिंदराय तू अजून लहान आहेस. तुला परिस्थितीचे गांभीर्य कळणार नाही. आज या घडीला आपल्या सर्वस्वाचे दान करून हिंदुधर्माचे मुसलमानी अत्याचारापासून रक्षण करील असा कोणी शूर पुरुष दिसत नाही.'' यावर बाल गोविंदराय चटकन उद्गारला, ''पिताजी ह्या कामासाठी आपल्याहून अन्य कोण योग्य असणार?'' जणू नियतीच गोबिंदरायच्या मुखाने बोलत होती. श्री गुरु तेगबहादरजींचा निश्चय झाला. ते काश्मिरी प्रतिनिधींना म्हणाले, ''जा जाऊन काश्मीरच्या सुभेदाराला सांगा. आमचे

गुरु श्री गुरु तेगबहादरजींना प्रथम मुसलमान करा. तसे झाले तर आम्ही सर्व मुसलमान होऊ.'' श्री गुरु तेगबहादरजी एवढ्यावरच थांबले नाहीत. तर त्यांनी खुद्द औरंगजेबालाही खरमरीत पत्र लिहिले. ते वाचून औरंगजेब लालीलाल झाला व त्यांनी श्री गुरु तेगबहादरजी यांना अटक करून दिल्लीस घेऊन येण्याचा पंजाबच्या सुभेदारास हुकूम सोडला. इकडे श्री गुरु तेगबहादरजी आपल्या धर्मप्रचाराच्या कार्यार्थ प्रवास करतच होते. दि. १२ जुलै १६७५ ह्यादिवशी मलिकपूर येथे मोगल सेनानीने श्री गुरु तेगबहादरजी यांना अटक करून एका लोखंडी पिंजऱ्यात बंदिस्त करून दिल्लीचा रस्ता धरला. श्री गुरु तेगबहादरजी यांच्याबरोबर त्यांचे शिष्य भाई मतीदास, भाई गुरुदित्ता, भाई उदा भाई चीमा व भाई दयाळ ह्या पाच जणांनाही पकडून दिल्ली येथे आणण्यात आले.

औरंगजेबाने हुकूमनामा देऊन एका काजीस पाठवले. त्याने श्री तेगबहादरजी यांना तो हुकूमनामा वाचून दाखवला व त्यास म्हणाला, तू पीर आहेस हे सिद्ध करण्यासाठी चमत्कार करून दाखव. श्री गुरु तेगबहादरजी उत्तरले, ''परमेश्वराने उत्पन्न केलेले विश्व हाच एक चमत्कार आहे. मी खुदाचा बंदा आहे. त्याच्या आज्ञेप्रमाणे मी कार्य करत असतो. मी अन्य कोणाच्याही आज्ञेने काही करत नाही. त्यामुळे काजी म्हणाला, मग तू मुसलमान हो म्हणजे तुला जिवंत ठेवण्यात येईल. मेल्यावर तू स्वर्गात जाशील. हिंदू म्हणून मेलास तर नरकात पडशील.'' श्री गुरु तेगबहादरजी उत्तरले, ''माझा धर्म सांगतो की माणसाच्या कर्मानुसार त्यास मृत्यूनंतर फल प्राप्त होते. मी आयुष्यभर नेक (सत्य) कर्मच करत आलो आहे. त्यानुसार मला जे फळ मिळावयाचे असेल ते तो माझा प्रभू मला देईल. त्याची मला चिंता नाही. दुसरे असे की केवळ जिवंत राहण्यासाठी मरणाच्या भयाने मी मुसलमान होणे शक्यच नाही. कारण हा संसार नश्वर आहे. ह्या जगात आलेल्या प्रत्येकास हे जग सोडून जायचेच आहे. मग मरणाची भीती कशाला ? मी मरणास सिद्ध आहे.''

मुसलमान लोक किती क्रूर असतात व ते किती अमानुष छळ करू शकतात. हे दाखवून त्यांना भयभीत करावे म्हणून श्री गुरु तेगबहादरजी यांच्यादेखत भाई मतीदासांना करवतीने उभे चिरण्यात आले. पण त्यांच्या चेहऱ्यावर भीतीचा लवलेशही नव्हता. भाई दयाल यांस उकळत्या पाण्यात टाकून मारण्यात आले. पण तो अखेर पर्यंत प्रभुनामात गुंग होतो. भाई मतीदासला कापसाच्या गाठीत बांधून पेटवून देण्यात आले. पण तोही अखेर पर्यंत प्रभुनामात तल्लीन होता. हे सारे श्री गुरू तेगबहादरजी आपल्या डोळ्यांनी पाहत होते. पण तरीही ते शांत होते.

शेवटी बादशहाने जाहीररीत्या भर चांदणी चौकात श्री गुरु तेगबहादरजींचा शिरच्छेद करावा असा हुकूम सोडला.

११ नोव्हेंबर ह्या दिवशी श्री गुरु तेगबहादरजी यांना चांदणी चौकात आणण्यात आले. दिल्लीतील सारी जनता आपल्या धर्मगुरूचे अखेरचे दर्शन घेण्यासाठी शोकाकुल मनाने चांदणी चौकात जमा झाली. अखेर तो क्षण आला. मारेकऱ्याने एकाच वारात श्री गुरू तेगबहादरजींचे शिर धडावेगळे केले आणि एक आश्चर्य घडले. भर मध्यान्ही प्रचंड वादळ उठले. सर्वत्र अंधकार पसरला. लोक सैरावैरा पळू लागले. ह्या संधीचा लाभ घेऊन भाई जेताजी व भाई उदयचंद यांनी मोठ्या धाडसाने शिपायांच्या पहाऱ्यास भेदून झडप घालून श्री गुरू तेगबहादरजींचे शिर पळवले व ते चादरीत गुंडाळून घोड्यावर स्वार होऊन टाकोटाक आनंदपूर येथे जाऊन पोहोचले व तेथे श्री गुरू गोबिंदसिंघ यांच्या हस्ते अंत्यविधी करण्यात आला.

शिर मिळाले. पण धड मात्र तेथेच पडून होते. वादळामुळे मुसलमान सैनिकही पळून गेले होते. ह्या संधीचा लाभ उठवून लखी शाहलुबान ह्या शिष्याने बैलगाडीतून धड पळवून आपल्या रकाबगंज येथील आपल्या घरी आणले व स्व हस्ते आपले घर पेटवून दिले. धन्य तो शिष्य ज्याने गुरुंच्या धडाचा अवमान होऊ नये म्हणून स्वत:चे घर पेटवून दिले. धन्य ते शीख ज्यांनी जीवाची पर्वा न करता आपल्या गुरुंचे शिर पळवून नेऊन त्याचा सन्मानपूर्वक अंत्यविधी केला.

श्री गुरु तेगबहादरजी यांच्या ह्या हौतात्म्याबद्दल श्री गुरू गोबिंदसिंघजी म्हणतात –

**तेगबहादर के चलय भयो जगत को सोक ।।**

**है है है सभजग भयो जै जै जै सुरू लोक ।।**

''तेगबहादरजींच्या हौतात्म्याने सारे जग शोकाकुल झाले. सारे जग हाय हाय करून हळूहळू लागले. पण तिकडे देवलोकात मात्र सारे देव त्यांचा जयजयकार करत होते.''

श्री गुरू गोबिंदसिंघजी-बचित्र नाटक-ह्या आपल्या आत्मचरित्रात लिहितात.

**धर्म हेत साका जिनी कीआ ।।**

**सीस दिआ पर सिररु न दिआ ।।**

श्री गुरू तेगबहादरजी यांनी हौतात्म्य पत्करले. धर्म रक्षणार्थ आपले शिर दिले. पण आत्मसन्मान सोडला नाही.

धन्य ते श्री गुरू तेगबहादरजी ! धन्य त्यांचे हौतात्म्य ! त्यांच्या पवित्र स्मृती त्रिवार वंदन.

।। हरि ओम तत् सत ।।

**– विनायक लिमये**

(०२०) २६९६२९०९

**संदर्भ –**

१) गुरू आनंद देव ते गुरू तेगबहादूर. ले डॉ. अशोक कामत

२) गुरू नानक ते गुरू गोबिंदसिंघ. ले. डॉ. अरविंद गोडबोले.

३) जीवन साखीयां गुरू हरि कृष्ण साहिबजी, गुरू तेगबहादूर साहिबजी,
ले. डॉ. अजितसिंघ औलाख.

४) श्री. गुरू तेगबहादरजी. ले. गुरुदेव कौर
जी. एस आनंद

◆ ◆ ◆

# परिशिष्ट ३

## भक्त कबीरांचे संक्षिप्त चरित्र

मध्ययुगीन भारतात भक्तिमार्गाचा झंझावात निर्माण झाला. अनेक संत, सत्पुरुषांनी त्यास पुष्टी दिली. त्यात भक्त कबीर हे प्रमुख होते. भक्त कबीरांचा, त्यांच्या विचारांचा प्रभाव पंधराव्या शतकापासून आजपर्यंत भारतीय भावविश्वावर कायम आहे. आजही उत्तर भारतात घराघरात कबीरांचे दोहे मोठ्या भक्तिभावाने गायले जातात. डॉ. आंबेडकर त्यांना आपले गुरू मानत. रवींद्रनाथ ठाकूर यांनी त्यांच्या दोह्यांचा इंग्रजीत अनुवाद करून कबीरांचे विचार जगभर पोचवले. महात्मा गांधींच्या विचारांवर कबीरांच्या विचारांचा फार मोठा प्रभाव होता.

अशा ह्या संत श्रेष्ठाच्या चरित्राविषयी काहीही विश्वासार्ह माहिती मात्र उपलब्ध नसावी हा दैवदुर्विलास आहे. जी काही माहिती उपलब्ध आहे ती लोककथा, दंतकथा, कबीरांच्या भक्तांनी लिहिलेली माहिती व कबीरांचे दोहे यातून मिळते तेवढीच. आपणही त्याच साधनांचा आधार घेऊन कबीरांचे चरित्र व विचार समजावून घेऊ या.

कबीरांच्या जन्माबद्दल अनेक कथा प्रचलित आहेत. कोणी म्हणतात की तो एका विधवेच्या पोटी जन्मला. लोकनिंदेला भिऊन त्या मातेने त्या बालकास टाकून दिले. निरू व निमा या मुस्लिम विणकर दांपत्यास तो सापडला, तर काहींच्या मते तो निरू-निमाचाच पुत्र आहे. काहीही असो तो निरू व निमा यांच्याच घरी वाढला हे मात्र निर्विवाद सत्य आहे.

कबीरांच्या जन्मसनाबाबतही असाच वाद आहे. सामान्यत: कबीरांच्या जन्माचे तीन सन सांगितले जातात ते असे. इ. स. १३७०, इ. स. १३९८ व इ. स. १४४०. रवींद्रनाथ टागोर इ. स. १४४० ग्राह्य धरतात. पण कबीरांचे भक्त त्यांचा जन्म सन १३९८ काशी क्षेत्री झाला असे मानतात. त्यासाठी ते कबीरांच्या खालील दोह्याचा आधार घेतात.

**चौदह सौ पचपन साल गए।**
**चंद्रवार इक ठाठ ठए।**
**जेठ खुदी बरसायत को।**
**पुरन मासी प्रगट भए।**

विक्रम संतत १४५५ (इ.स. १३९८) सोमवार वट सावित्रीच्या ज्येष्ठ शुद्ध पौर्णिमा या दिवशी प्रगट झाले. कबीरपंथी याच दिवशी म्हणजे ज्येष्ठी पौर्णिमेस कबीर जयंती साजरी करतात.

त्या काळी शिक्षणाचे दरवाजे हिंदू व मुसलमान दोन्ही समाजात फक्त उच्च वर्णीयांनाच उघडे होते. कबीर तर गरीब व नीच मुस्लिम कुळातील होते. त्यामुळे त्यास काहीही शिक्षण मिळाले नाही त्याबद्दल कबीर सांगतात –

**मसि कागद छुयो नही, कलम गहि नही हाथ।**
**चार ही युग की महातम, मुखहि जनाई बात।।**

''मी शाई वा कागदाला स्पर्शही केला नाही. कधी लेखणीही हातात धरली नाही. पण चारही युगातील ज्ञान मी केवळ ऐकून प्राप्त केले.'' निरक्षर असूनही आपल्या अंगभूत गुणांनी कबीरांनी समाजास अध्यात्माचा, बंधुतेचा मार्ग दाखवला हे त्यांचे खरे थोरपण आहे.

कबीर लहानपणापासून रामभक्त होते. त्यांच्या तोंडी कायम राम, हरी, गोविंद हीच नावे होती. उपजतच ते ईश्वरभक्त होते.

कबीरांनी आपल्या काव्यात जागोजागी गुरू महिमा गायला आहे. ते म्हणतात –

**तीन लोक नौखंडमे गुरुते बडा न कोइ।**
**करता करै न करि सकै गुरुते बडा न कोइ।**

पण त्यांच्या संपूर्ण लिखाणात त्यांनी कोणाचा, कोणा व्यक्तीचा आपला गुरू म्हणून महिमा गायला नाही. साधा उल्लेखही केलेला आढळत नाही. त्या काळी काशी क्षेत्री स्वामी रामानंद हे सत्पुरुष वास्तव्य करून होते. वेद, षडदर्शने, शास्त्रे यावरील त्यांचा अधिकार फार मोठा होता. ते उदारमतवादी होते. ईश्वरभक्तीचा अधिकार प्रत्येक व्यक्तीस आहे असे ते मानत. त्यास जात, पात, वर्ण काहीही आड येत नाही असे ते सांगत. त्यामुळेच त्यांच्या भक्तात सर्व जाती-जमातीचे लोक होते. त्यात पीपा, धन्ना, सैन, रवीदास आदी प्रमुख भक्त होते. श्री गुरू ग्रंथसाहिबमध्ये कबीराबरोबर ह्याही भक्तांच्या रचनांचा समावेश केलेला आहे. कबीरांचेही स्वामी रामानंदांकडे जाणे-येणे होते. म्हणून तेच त्यांचे गुरू होते असे सांगितले जाते. त्या संबंधीची एक कथा प्रचलित आहे ती अशी –

स्वामी रामानंद रोज भल्या पहाटे अंधार असतानाच गंगेवर स्नानासाठी जात. एका पहाटे कबीर रामानंदांच्या वाटेवर जाऊन बसला. स्वामी रामानंद स्नान करून परत येत असता त्यांचा पाय कबीरास लागला. त्यांच्या तोंडून 'राम' 'राम' असे शब्द बाहेर पडले. कबीर आता ज्याला त्याला सांगू लागला – 'मला स्वामी रामानंदांनी दीक्षा दिली.' ही वार्ता स्वामी रामानंदांच्या कानी गेली. त्यांनी कबीरास विचारले, ''मी केव्हा रे तुला दीक्षा दिली ?'' कबीराने झाला सर्व प्रकार त्यांना सांगितला व म्हणाला, ''तुम्हीच तर सांगता की रामनामाहून जगात अन्य काहीही श्रेष्ठ नाही. मग तुम्ही दीक्षा देताना रामनामाहून अन्य काय सांगता ?'' स्वामी रामानंद निरुत्तर झाले.

कबीर अशिक्षित असले तरी ते बहुश्रुत होते. कुशाग्र बुद्धी, तर्कशुद्ध विचारपद्धती, नवनवीन ज्ञान प्राप्त करण्याची जिज्ञासु वृत्ती यामुळे त्यांनी हिंदू, मुसलमान, जैन, बुद्ध आदी धर्मांच्या धर्मग्रंथातील आध्यात्मिक विचार, तत्त्वे आत्मसात केली होती. प्रत्येक धर्मातील बलस्थाने व उणिवा त्यांनी हेरल्या होत्या. त्याचप्रमाणे योगिक क्रियांचा अभ्यास करून काही सिद्धीही प्राप्त करून घेतल्या असाव्यात असे मानण्यास जागा आहे. प्रारंभी ते रामाच्या सगुण मूर्तीचे उपासक होते. पण नंतर ते सर्वत्र रममाण असणाऱ्या निर्गुण निराकार प्रभुपरमात्म्याचे, त्या निराकार प्रभुरामाचे उपासक बनले. सत्संगातून त्यांनी हे सारे ज्ञान प्राप्त केले होते म्हणूनच आपल्या दोह्यात कबीरांनी सतगुरूचा व सत्संगाचा खूप महिमा गायला आहे.

कबीरांच्या वैवाहिक जीवनाबद्दलही अनेक मतभेद आहेत. कबीर सांगत, की प्रभुप्राप्तीसाठी संन्यास घेऊन रानावनात जाण्याची काहीही गरज नाही. प्रपंचात राहूनही सदाचाराने वागून, निष्काम कर्म करून, प्रभू भक्ती करून, प्रभू परमात्मा प्राप्त करून घेता येतो. त्यांच्या ह्या शिकवणीमुळे कबीर विवाहित होते एवढेच नव्हे तर त्यांना दोन वा तीन बायका होत्या असेही सांगतात. पण कबीरपंथी लोक कबीर ब्रह्मचारी होते असेच मानतात. काही लोक कबीरांच्या पत्नीचे नाव 'लोई' असल्याचे सांगतात. कबीरांच्या दोह्यात काही ठिकाणी 'लोई' असा शब्द आला आहे. त्यावरून हे दोहे आपल्या पत्नीला उद्देशून लिहिले आहेत असे हे लोक सांगतात. तर काही अभ्यासकांच्या मते 'लोई' हा शब्द लोक ह्या अर्थी वापरला आहे व ते दोहे लोकांना उपदेश देण्याकरिता लिहिले आहेत असे सांगतात.

कबीर मुसलमान असूनही रामाचे नाव घेत. हिंदूच्या देवाची उपासना करीत. मुसलमान समाजातील दुष्ट रूढी, जुलूम जबरदस्ती, अत्याचार ह्या गोष्टींवर टीका करीत. तसेच ते हिंदू समाजातील पुरोहितशाही, कर्मकांड ह्यावरही कडाडून हल्ला चढवत. त्यामुळे हिंदू समाजातील उच्चवर्णीय लोक व मुसलमान समाजातील मुल्ला मौलवी, अमीर उमराव यांचा त्यांना विरोध सहन करावा लागला. पण हिंदू व मुसलमान समाजातील सर्वसामान्य लोक मात्र कबीरांकडे, त्यांच्या साध्या सोप्या

भक्तिमार्गाकडे, आकृष्ट होऊन त्याचे अनुयायी बनत.

कबीरांचा द्वेष करणाऱ्यांनी म्हणजेच ब्राह्मण, पंडित, श्रीमंत लोक, मुल्ला मौलवी आदी लोकांनी काजीमार्फत बादशहा सिकंदर लोदीकडे कबीराविरुद्ध तक्रार केली. बादशहाने कबीरास बोलावून घेतले. काजीने कबीरास बादशाहाला सलाम करण्यास सांगितले. कबीर म्हणाले, ''मी प्रभूरामाशिवाय अन्य कोणास सलाम करत नाही.'' ह्या उत्तराने चिडून जाऊन बादशहा म्हणाला, ''अरे कोष्ट्या ! तू मुसलमान असून आपला धर्म सोडून असा वाकड्या मार्गाने का चालला आहेस ?'' कबीर म्हणाले, ''मला हिंदू वा मुसलमानांशी काहीही कर्तव्य नाही. माझ्या सतगुरूने आदेश दिल्याप्रमाणे मी रामभक्ती करत आहे. माझा सारा भार प्रभू रामचंद्रावर आहे. त्याच्या खेरीज मी अन्य कोणासही जाणत नाही. मग तो राजा असो वा रंक.'' काजीने बादशाहास सांगितले, ''इस्लामची निंदा करणारा कबीर काफीर आहे. त्यास दगडांनी ठेचून ठार मारावे.'' कबीर म्हणाले, ''वास्तविक खरे काफीर तुम्हीच आहात. कोणत्या धर्मग्रंथात जीवांची हत्या करण्याची आज्ञा दिली आहे ? जीवांची हत्या करून तुम्हीच पाप करीत आहात. यम तुमच्या छाताडावर नाचून तुम्हास तुडवून तुडवून मारून टाकील.'' ह्या उत्तराने बादशहा संतप्त झाला व त्याने कबीरास गंगा नदीत बुडवून टाकण्याची आज्ञा केली. कबीर शांत होते. ते रामनामात तल्लीन होते. कबीरांचे हात-पाय साखळदंडांनी बांधून त्यांना गंगा नदीत टाकून देण्यात आले आणि चमत्कार झाला. एक मोठी लाट आली. कबीरांचे साखळदंड गळून पडले व कबीर एका भल्या मोठ्या कासवाच्या पाठीवर बसून किनाऱ्यावर सुखरूप परत आले. बादशाहने कबीरास हत्तीच्या पायाखाली तुडवून मारण्याची आज्ञा दिली. एक चवताळलेला मत्त हत्ती कबीरांच्या अंगावर सोडला. पण कबीरांपाशी पोहोचताच तो हत्ती शांत झाला व कबीरांना नमस्कार करून तो हत्ती माघारी निघून गेला. कबीरास गवताच्या झोपडीत जाळून मारून टाकण्याचा प्रयत्न झाला. पण त्यातूनही कबीर सुखरूप बाहेर पडले. त्याबद्दल एका दोह्यात कबीर सांगतात

**जन कबीर जड़ि जंजीर बोरे जलमाही ।**
**अग्नी नीर गंज त्रास राखे किधौ नाही ।।**

ह्या सर्व प्रकारांनी बादशाहचा भ्रम निरास झाला व तो कबीरांचा आदर करू लागला. आता सर्वत्र कबीरांचा बोलबाला झाला. सगळे लोक कबीर, कबीर म्हणू लागले. एका दोह्यात कबीर म्हणतात,

**कबीर ना हम किआ न करहिगे, ना करि सकै सरीरु ।**
**किआ जानउ किछु हरि कीआ, भइओ कबीरु कबीरु ।।**

''मी काहीही केले नाही. काही करूही शकणार नाही. जे काही केले, जे काही घडले, ते त्या प्रभू परमात्म्यानेच केले. पण लोकात मात्र कबीराचे नाव झाले.''

कबीरांची वाढती लोकप्रियता सहन न होणाऱ्यात शेख तकी हे एक मुस्लिम सुफी पंथी संत होते. बादशाह सिकंदर लोदी त्यांचा खूप आदर करीत. एकदा बादशाह, शेख तकी व कबीर गंगा किनारी बसले असता, गंगा नदीच्या पात्रातून एका मुलाचे प्रेत वाहत येत असाताना दिसले. कबीराचा पाणउतारा करण्यास ही संधी उत्तम आहे असे जाणून शेख तकी बादशाहास म्हणाले, ''कबीर स्वत:स ईश्वराचा अवतार समजतोना ? मग तो ह्या प्रेतास सहज जिवंत करू शकेल.'' हे शब्द ऐकताच कबीरांनी हात उंच करून त्या प्रेतास आपल्याकडे येण्यास सांगितले. ते प्रेतही वेगाने नदीच्या प्रवाहातून किनाऱ्याकडे आले. कबीर म्हणाले, ''ह्या मृत शरीरातील आत्मा परत ह्या शरीरात प्रवेश करो '' आणि चमत्कार झाला. ते प्रेत जिवंत झाले व पाण्याबाहेर येऊन त्या मुलाने कबीरांच्या चरणावर मस्तक ठेवले. बादशाह आश्चर्याने ओरडला, ''वाह खूब कमाल !'' तेव्हापासून त्या मुलास 'कमाल' हे नाव प्राप्त झाले. हाच कबीरांचा मुलगा कमाल.

त्यांची मुलगी कमालीबद्दलही अशीच एक कथा प्रचलित आहे. कमाली ही शेख तकींची मुलगी. ती मेल्यावर तिला कबरीत पुरले होते. शेख तकी म्हणाले, ''जर कबीराने ह्या मुलीस जिवंत केले तर मी जन्मभर त्यांचा गुलाम होईन. त्यांचा शिष्य होऊन राहीन.'' शेख तकी व कबीर मुलीच्या कबरीपाशी गेले. शवपेटीवरील माती दूर करण्यात आली. शवपेटी उघडण्यात आली. कबीर म्हणाले, ''शेख तकीच्या मुली ऊठ!'' पण काहीही घडले नाही असे तीन वेळा झाले. शेवटी कबीर म्हणाले, ''हे कबीराच्या मुली ऊठ!'' प्रभुकृपेने ते प्रेत जिवंत झाले. शेख तकींची मुलगी कबरीतून बाहेर आली व तिने कबीरांच्या पायावर डोके ठेवले. शेख तकीकडे न जाता ती कबीरांच्या घरी आली. हीच कबीरांची मुलगी कमाली. लोई, कमाल व कमाली यांच्याबद्दलच्या ह्या कथांवरून कबीर विवाहित होते का, ह्याबद्दल शंका वाटते. पण प्रपंचात राहून परमार्थ साधता येतो असे ते सांगत. कबीरांनी आपल्या भक्ति विचारांच्या प्रचारार्थ चत्रभुज, बंकेजी, सहेतजी व धर्मदास या आपल्या चार शिष्यांना भारताच्या चार दिशांना पाठवले होते.

कबीरांना लिहिता-वाचता येत नव्हते. त्यांनी सर्व ज्ञान सत्संगातून प्राप्त केले. त्यांचे विचार ते दोह्यातून, साखीतून, शब्दरूपाने बोलून दाखवत व त्यांचे शिष्य ते लिहून ठेवीत. त्याला शब्द, बानी, वचन, आदेश अशी नावे आहेत. कबीराची 'साखी' प्रसिद्ध आहे. साखी हा शब्द 'साक्षी' ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. ज्या गोष्टी कबीरांनी स्वत: समक्ष पाहिल्या, अनुभवल्या त्या त्यांनी सांगितल्या. त्यावरून 'साखी आँखी ज्ञान की' असे म्हटले जाते.

कबीरांच्या ६०० पदांचा एक संग्रह कबीरांचे एक शिष्य भगवानदास यांनी तयार केला आहे. तो 'बीजक' ह्या नावाने प्रसिद्ध आहे. हा कबीर पंथीयांचा धर्मग्रंथ मानला जातो. कबीरांसंबंधी माहिती अनुराग सागर, सुख निधान, निरंजन बोध आदी ग्रंथांत ग्रथित केली आहे. काशी नगरी प्रचारिणी सभेने कबीर ग्रंथावली या नावाचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्यात ४०० दोहे, ८०० साख्या व इतर काही पदांचा समावेश आहे.

कबीरांची भाषा पुरबी हिंदी आहे असे कबीर स्वत: सांगतात. पण त्यात अवधी, व्रज, भोजपुरी, खडीबोली, अरबी, फारशी अशा तत्कालीन सर्व प्रचलित भाषांतील शब्द विपुल प्रमाणात आढळतात. त्यांचा भाषेला 'सुधुक्कडी' असेही म्हणतात.

कवी ह्या दृष्टीने कबीरांचे स्थान फार फार उच्च आहे. त्यांच्या काव्यात एक अद्‌भुत शक्ती आहे. त्यांची वाणी ओजस्वी, निर्भीड आणि थेट हृदयाला जाऊन भिडणारी आहे म्हणूनच ती प्रत्ययकारी आहे.

कबीरांनी वयाची शंभरी ओलांडली तरीही लोकजागृतीचे त्यांचे कार्य अव्याहतपणे चालू होते. कबीरांनी त्या काळी भारतात प्रचलित असलेल्या सर्व धर्मांचा, पंथांचा अभ्यास केला असला, तरी भक्तिमार्गावरच त्यांनी भर दिला होता. त्यांची भक्ती, प्रेमावर आधारलेली आहे. शुद्ध चारित्र्य, निष्काम सेवा, अनासक्त वृत्ती व साधी राहणी ह्या गोष्टींना त्यांनी आपल्या आचरणात व उपदेशात अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे.

जात-पात, कुलाभिमान, धर्मभेद, रूढी, कर्मकांड, अंधश्रद्धा, व्रत वैकल्य यावर त्यांनी कडाडून हल्ला चढवला आहे. त्यांचा मुख्य भर प्रत्यक्षानुभूतीवर आहे. ज्या प्रमाणे कस्तुरीमृगाच्या नाभीतच कस्तुरी दडलेली असते, पण तो मृग कस्तुरीच्या शोधात दशदिशात हिंडत असतो, त्याचप्रमाणे प्रत्येक जीवाच्या अंतरातच प्रभू परमात्मा विराजमान आहे. पण तो मात्र परमेश्वराच्या शोधासाठी रानावनात हिंडत असतो. नाना व्रते, अनुष्ठाने करीत असतो. आपल्यातील प्रभू परमात्म्यास ओळखणे हाच प्रत्येक जीवाचा जीवन हेतू आहे. सतगुरूच्या कृपेने प्रभू परमात्म्याची मन:पूर्वक भक्ती केल्याने त्याची प्राप्ती होते असे कबीर सांगत.

त्या काळी अशी दृढ समजूत होती, की काशी क्षेत्रात मरण आल्यास माणसास स्वर्ग प्राप्ती होते, तर मगहर ह्या गावी

मरण आल्यास पुढील जन्म गाढवाचा येतो व तो जीव उकिरडे फुंकत हिंडतो. कबीरांनी ह्या समजुतीवर घणाघाती हल्ला चढवला. ते सांगत मनुष्य कोठे जन्मला वा कोठे मेला ह्यावर स्वर्गप्राप्ती अवलंबून नसून तो कसा जगला, त्याने जन्माला येऊन काय केले हे महत्त्वाचे. प्रभुप्राप्तीसाठी त्याने काय प्रयत्न केले हे महत्त्वाचे. हे स्वत:च्या कृतीने सिद्ध करण्यासाठी आपले अवतारकार्य संपले आहे ह्याची जाणीव झाल्यावर त्यांनी काशी क्षेत्राचा त्याग केला. ते मगहर ह्या गावी गेले व तेथेच वयाच्या एकशे विसाव्या वर्षी इ.स. १५१८ मध्ये आपली जीवनयात्रा संपवून ते आत्मतत्त्वात विलीन झाले. आजही भारतात हजारो कबीरपंथी कबीरांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

श्री गुरू ग्रंथ साहिबमध्ये भक्त कबीरांच्या २२८ पदांचा व २४३ श्लोकांचा समावेश केलेला आहे. त्यावरून आपणास त्यांच्या विचारांचा अधिक परिचय होईल.

॥ हरि ओम तत् सत ॥

**– विनायक लिमये**
(०२०) २६९६२९०९

**संदर्भ –**

१) मराठी चरित्र कोश – खंड १
२) बाबासाहेब आंबेडकरांचे मार्गदर्शक – संत कबीर, ले. सुभाष कांबळे
३) संत कबीर – नॅशनल बुक ट्रस्ट - नवी दिल्ली.
४) कबीर – मंगेश पाडगावकर
५) भक्तों का जीवन परिचय – अलग

◆◆◆